आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२ सप्टेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मनमाड-धुळे-इंदूर रेल्वेमार्गाला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी, ५ वर्षात पूर्ण करण्याचे सरकारचे उद्दिष्ट
- शेतीमध्ये नवतंत्रज्ञान आणणं, कृषी शिक्षण, कृषी विज्ञान केंद्रांच्या आधुनिकीकरणासाठी सुमारे १४ हजार कोटी रुपयांच्या ७ योजनांनाही केंद्र सरकारची मान्यता
- कार्यप्रणालीत बदल करुन तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं वारणानगरमधून सहकारी संस्थांना आवाहन
- तेलंगणामध्ये अतिवृष्टीमुळं १६ जणांचा आणि महाराष्ट्रात ४ जणांचा मृत्यू

**आणि**

- पॅरिस पॅरालम्पिकमध्ये नितेश कुमारला सुवर्ण, तर योगेश कथुनिया याला रौप्य पदक

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रीमंडळानं आज बहुप्रतिक्षित मनमाड-धुळे-इंदूर रेल्वेमार्गाला मंजुरी दिली. या ३०९ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गासाठी १८ हजार ३६ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. येत्या ५ वर्षात हा प्रकल्प पूर्ण होईल, असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळाची आज बैठक झाली.

महाराष्ट्रतले २ आणि मध्यप्रदेशातले ४ जिल्हे या रेल्वेमार्गाद्वारे जोडले जाणार आहे. या मार्गावर ३० रेल्वे स्थानकं असतील, यामुळं १ हजार गावांना आणि ३० लाख नागरिकांना याचा फायदा होईल, असं वैष्णव म्हणाले. यामुळं उत्तर महाराष्ट्रातल्या कांदा उत्पादक जिल्ह्यांना आणि मध्यप्रदेशातल्या भरड धान्य उत्पादन जिल्ह्यांना फायदा होईल, असं रेल्वेमंत्र्यांनी सांगितलं. या

रेल्वेमार्गासाठी पावसाळी अधिवेशनात रेल्वेमंत्र्यांना पत्र दिलं होतं. आता याला मंजुरी मिळाल्याबद्दल धुळ्याच्या खासदार शोभा बच्छाव यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत. धुळेकर नागरिकही या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त करत आहेत.

शेतकऱ्यांसाठीच्या १३ हजार ९६६ कोटी रुपयांच्या ७ योजनांनाही केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. त्यात डिजिटल कृषी मिशन, कृषी विज्ञानाद्वारे खाद्य आणि पोषणमूल्य जतनाचा समावेश आहे. यामुळं कृषी क्षेत्रात अनेक नवनवीन तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे. कृषी क्षेत्रातलं शिक्षण व्यवस्था बळकट कार्यासाठी २ हजार कोटींहून अधिक रकमेच्या निधीलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली.

जनावरांचं प्रजनन आणि आरोग्य, फलोत्पादन, कृषी विज्ञान केंद्राचं आधुनिकीकरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या व्यवस्थापनासाठीच्या विविध योजनांना मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली.

मंत्रीमंडळांना आज गुजरातमधल्या साणंदमध्ये एक सेमीकंडक्टर प्रकल्प उभा करायलाही मंजुरी दिली.

**<><><><><>**

यंदा देशात खरीप पिकांच्या पेरणी क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली आहे. १० कोटी ८७ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर आतापर्यंत पेरणी झाली असल्याचं कृषी आणि शेतकरी कल्याण विभागानं आज प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटलं आहे. गेल्यावर्षी पेक्षा यंदा २१ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर खरीपाची पेरणी झाली आहे.

४ कोटी ८ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर भात, तर १ कोटी २५ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर कडधान्यांची लागवड झाली आहे. तृणधान्यांखालच्या क्षेत्रानं यंदा १ कोटी ८७ लाख हेक्टरचा टप्पा ओलांडला असून, गळीताचं क्षेत्रं १ कोटी ९० लाख हेक्टरच्या वर गेलं आहे.

यंदा आतापर्यंत ५७ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर ऊसाची लागवड झाली आहे.

**<><><><><>**

नेटफ्लिक्स या ओटीटी मंचावरच्या आयसी-८१४ - द कंदाहार हायजॅक या वेबसीरीजवरून झालेल्या वादंगाबाबत माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं नेटफ्लिक्सच्या आशयनिर्मिती प्रमुखांकडून स्पष्टीकरण मागितलं आहे. आशयनिर्मिती प्रमुख स्वतः उद्या मंत्रालयासमोर उपस्थित राहण्याची शक्यता असल्याचं सूत्रांनी सांगितलं आहे. या वेबसीरीजमधल्या काही पात्रांच्या चित्रणावर आक्षेप घेण्यात आला आहे.

**<><><><><>**

येत्या महिनाअखेरपर्यंत LIC अर्थात जीवन वीमा महामंडळ विविध सुधारणा करण्यासाठी सर्व योजना मागे घेत असल्याचं वृत्त बनावट असल्याचं केंद्र सरकारनं कळवलं आहे. यासंदर्भात समाज माध्यमांवर पसरवली जात असलेली माहिती बनावट असल्याचं पीआयबीच्या फॅक्ट चेकमध्ये स्पष्ट झालंय.

**<><><><><>**

देशातल्या गुंतवणूकदारांना लवकरच अडीचशे रुपयाची SIP करता येणार आहे. यामुळं अधिकाधिक लोकांपर्यंत या गुंतवणूक सुधारणांचे फायदे पोहोचतील अशी माहिती सेबीच्या अध्यक्ष माधवी पुरी बूच यांनी दिली. म्युच्युअल फंड उद्योगासोबत या प्रस्तावावर काम सुरू आहे, असं त्या म्हणाल्या. IPO सोबत दिलं जाणारं माहितीपत्रक १५-१६ प्रादेशिक भाषांमध्ये असावं, अशी गरज त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

सहकारी संस्थांनी कार्यप्रणालीत बदल करावे, तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करावा असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. कोल्हापूरच्या वारणानगर इथं श्री वारणा महिला सहकारी गटाच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमात त्या बोलत होत्या. श्री वारणा महिला सहकारी विविध उद्योग समूहाचा सुवर्ण महोत्सवी सोहळा आणि वारणा विद्यापीठाचं उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. सहकार क्षेत्राच्या संपूर्ण क्षमतेचा वापर अद्याप झालेला नाही. या संस्थांनी व्यवस्थापनात अचूकता आणावी, यासाठी अधिकाधिक युवांना या क्षेत्राशी जोडून घ्यावं, असं त्यांनी सुचवलं...

**होल्ड - बाईट - मुर्मू**

महिला हा समाजाचा महत्त्वाचा भाग असून त्यांची उपेक्षा करून समाजाचा विकास साधता येत नाही, असं राष्ट्रपती म्हणाल्या.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयानं शंभू सीमेवर आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या तक्रारींचं निराकरण करण्यासाठी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती नवाब सिंग यांच्या नेतृत्वाखाली आज एक समिती स्थापन केली आहे. या

समितीला आठवडाभरात पहिली बैठक घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती उज्वल भुयान यांच्या खंडपीठानं दिले आहेत.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांचं राजकारण करू नये, समितीने टप्प्याटप्प्याने त्यावर विचार करावा, पर्यायी ठिकाणी शेतकरी शांततापूर्ण आंदोलने करू शकतात, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्राच्या विविध भागात पावसानं जोर धरला आहे. मराठवाड्यात हिंगोली, जालना आणि परभणीत काल रात्री जोरदार पाऊस झाला आहे. अतिवृष्टीत ४ लोकांना प्राण गमवावे लागले असून, १७ जण जखमी झाले आहेत. ८८ जनावरं या अतिवृष्टीत दगावली आहेत. १६० कच्च्या घरांची पडझड झाली आहे.

मराठवाड्यातल्या विविध जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आढावा घेतला असून, शेतीसह इतरही नुकसानीचे तत्काळ पंचनामे करुन प्रशासनानं त्वरित मदत करावी, असेही निर्देश दिले आहेत.

<><><><><>

तेलंगणामध्ये अतिवृष्टी मुळे किमान 16 जणांचा मृत्यू झाला आहे. राज्याचे माहिती तंत्रज्ञान मंत्री डी श्रीधर बाबू यांनी आज हैदराबादमध्ये प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. खम्मम, महबूबाबाद आणि सूर्यपेटच्या काही भागांत परिस्थिती अजूनही गंभीर आहे. पाऊस आणि संबंधित घटनांमध्ये मृतांच्या नातेवाईकांना सरकारने तात्काळ मदत जाहीर केली आहे, असं डी श्रीधर बाबू यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

राज्य सरकारतर्फे दिल्या जाणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार आज जाहीर झाले. यावेळी विविध प्रवर्गांमधे ११० जणांची पुरस्कारांसाठी निवड झाली आहे. २०२३-२४ या वर्षासाठी ३८ प्राथमिक

शिक्षकांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तर ३९ माध्यमिक शिक्षक पुरस्काराचे मानकरी ठरले आहे. आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे प्राथमिक शिक्षक एकूण आदर्श शिक्षिका ८, विशेष शिक्षक कला आणि क्रीडा दोन, दिव्यांग शिक्षक किंवा दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळेमधले शिक्षक एक, तर स्काऊट आणि गाईडसाठी प्रत्येकी १ अशा १०९ शिक्षकांची निवड समितीनं केली आहे. तर वर्धा जिल्ह्यातल्या प्राथमिक शिक्षकासाठी न्यायालयाच्या आदेशानुसार २०२२-२३ चा पुरस्कारही यावेळी जाहीर केला आहे. पुरस्कार वितरण येत्या ५ सप्टेंबरला म्हणजे शिक्षक दिनी मुंबईत होणार आहे.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिम्पिकचा आजचा पाचवा दिवस भारतासाठी सकारात्मक ठरला. बॅडमिंटनपटू नीतेश कुमार यानं ग्रेट ब्रिटनच्या डॅनिएल बेथेल याचा २१-१४, १८-२१, २३-२१ असा पराभव करून सुवर्णपदकावर नाव कोरलं आणि भारताची पदकसंख्या नऊवर नेली. तत्पूर्वी भालाफेकपटू योगेश कथुनिया यानं रौप्यपदक पटकावलं. त्यानं ४२ मीटर २२ सेटींमीटर अंतरावर भाला फेकला.

बॅडमिंटनपटू तुलसीमती मृगेशन हिनं मनीषा रामदास हिच्यावर मात करत अंतिम फेरीत धडक मारून आणखी एक पदक निश्चित केलं. आता तिचा पुढचा सामना चीनच्या प्रतिस्पर्ध्याशी होणार आहे. तर मनीषा रामदास कास्यपदकासाठी डेन्मार्कच्या बॅडमिंटनपटूशी लढत देईल. तिरंदाजी स्पर्धेत अग्रमानांकित राकेश कुमार याचं पुरुषांच्या वैयक्तिक कंपाउंड स्पर्धेतलं रौप्यपदक अगदी थोडक्यात हुकलं. त्यानं ३०पैकी ३० गुण मिळवून स्पर्धेला सुरुवात केली खरी, मात्र चीनच्या हे झिहाओ याच्यापेक्षा फक्त एक गुण कमी मिळाल्यानं त्याला चौथ्या स्थानावर समाधान मानावं लागलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पदक विजेत्यांचं अभिनंदन केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज पॅरिस

पॅरालिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणारी नेमबाज अवनी लेखरा हिच्याशी संवाद साधला.